# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

फॅक्स २५६५६२३४ Email : ropune@dtemaharashtra.gov.in Web Site : - www.ropune.org.in

**अतितात्काळ :**

जा.क्र.तंशिविकापु/विवि/वृक्षलावड-२०१९/1347
दिनांक : 22/03/19

प्रति,,
प्राचार्य / संचालक,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त
सर्व पदविका, पदवी व पदव्यु-तर पदवी
व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणा-या संस्था
(पुणे विभाग)

**विषय :- सन २०१९ मधील ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाचे नियोजन पूर्वतयारी आव्हाने व उपाययोजना इत्यादीबाबत...**

संदर्भ :- १. तंत्रशिक्षण संचालनालयाचे पृष्ठांकन पत्र क्रमांक:१६/संकीर्ण/२०१९/४१, दि. २९/०१/२०१९
२. महसूल व वन विभागाचे पत्र क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.११३/म-८, दि. २१/०१/२०१९.
३. महसूल व वन विभागाचे पत्र क्र:साबवि-२०१८/प्र.क्र.१११/फ-११, दि. १६/०१/२०१९.

सन २०१९ मधील ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांचे नियोजन, पूर्वतयारी , आव्हाने व उपाययोजना इत्यादीबाबत महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासनाचे उपरोक्त संदर्भिय पत्रानुसार प्रस्तावित ३३ कोटी वृक्षलागवड कार्यक्रमाची अंमलबजावणी योग्य दिशेने व्हावी यासाठी प्रत्येक संस्थेने सर्वसाधारण माहिती न देता अधिक विशिष्ट स्वरुपात माहिती द्यावी. सदर माहिती संकलित झाल्यास, आपल्या संस्थेत वृक्षलागवडीसाठी किती वाव आहे ? याचा निश्चित अंदाज बांधता येईल. त्यामध्ये वृक्षलागवडीसाठी संस्था स्तारावर किती जागा उपलब्ध आहे ? वृक्षलागवडीसाठी स्थळ निश्चिती, दि. ३१/०३/२०१९ पूर्वी खड्डे तयार करणे, सदर माहिती वन विभागाच्या डिजीटल प्लॅटफॉर्मवर अपलोड करणे व यापूर्वीच्या ०२, ०४ व १३ कोटी वृक्षलागवडी अंतर्गत रोपांचे जिवंत राहण्याचे प्रमाण व माहिती वन विभागाच्या संकेतस्थळावर अपलोड करणे इत्यादींबाबतच्या माहितीचा समावेश आहे. तरी याबाबतची आपल्या संस्थेची बिनचूक माहिती सोबत दिलेल्या प्रपत्रात भरुन दिनांक १६/०४/२०१९ रोजी, दुपारी ०३.०० वाजेपर्यंत या कार्यालयाच्या info.ropune@gmail.com या ई-मेल आयडीवर **सॉप-ट कॉपी (Soft Copy) व पी.डी.एफ (PDF)** मध्ये पाठवावी.

सोबत : वरीलप्रमाणे.

प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत – या कार्यालयातील प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

# सन २०१९ मधील ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांचे नियोजन, पूर्वतयारी व उपाययोजना बाबतची माहिती (पुणे विभाग)

| डी.टी.ई कोड | जिल्हा | तालुका | संस्थेचे नांव व परिसरात वृक्ष लागवडीसाठी उपलब्ध क्षेत्र (हेक्टरी) | १ ते ७ जुलै २०१९ रोजी, होणा-या वृक्षारोपणासाठी एकूण संख्या (प्रति हेक्टरी १००० रोजे) | वृक्षारोपण स्थळाची माहिती वन विभागाच्या डिजीटल प्लॅटफॉर्मवर अपलोडींगची सद्यस्थिती | निवडलेल्या वृक्षारोपण स्थळांच्या ठिकाणी दि.३१ मार्च, २०१९ अखेर खड्डे तयार करण्याबाबत सद्यस्थिती | ०१ जुलै २०१६ रोजी, केलेल्या वृक्षारोपण कार्यक्रमाचे स्थळ | ०१ जुलै २०१६ रोजी वृक्षारोपण कार्यक्रमात लावण्यात आलेल्या वृक्षांची संख्या | ०१ जुलै २०१६ रोजी, वृक्षारोपण कार्यक्रमात लावण्यात आलेल्या जिवंत वृक्षांची संख्या व त्यांची टक्केवारी | वृक्षारोपण स्थळांची माहिती वन विभागाच्या डिजीटल प्लॅटफॉर्मवर अपलोडींगची सद्यस्थिती | ०१ जुलै २०१७ रोजी, केलेल्या वृक्षारोपण कार्यक्रमाचे स्थळ | ०१ जुलै २०१७ रोजी वृक्षारोपण कार्यक्रमात लावण्यात आलेल्या वृक्षांची संख्या | ०१ जुलै २०१७ रोजी, वृक्षारोपण कार्यक्रमात लावण्यात आलेल्या जिवंत वृक्षांची संख्या व त्यांची टक्केवारी | वृक्षारोपण स्थळांची माहिती वन विभागाच्या डिजीटल प्लॅटफॉर्मवर अपलोडींगची सद्यस्थिती | ०१ जुलै २०१८ रोजी, केलेल्या वृक्षारोपण कार्यक्रमाचे स्थळ | ०१ जुलै २०१८ रोजी वृक्षारोपण कार्यक्रमात लावण्यात आलेल्या वृक्षांची संख्या | ०१ जुलै २०१८ रोजी, वृक्षारोपण कार्यक्रमात लावण्यात आलेल्या जिवंत वृक्षांची संख्या व त्यांची टक्केवारी | वृक्षारोपण स्थळांची माहिती वन विभागाच्या डिजीटल प्लॅटफॉर्मवर अपलोडींगची सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |

संस्था प्रमुखाची स्वाक्षरी